For Your Record

| | |
|---|---|
| Client: JEHANGIR HOSPITAL | Date: 12/1/07 |
| Publication: SANSVARTA | Edition: |
| Media Evaluation: | Page No: 1 |



*जहांगीर हॉस्पिटलच्या अत्याधुनिक कार्डिएक सेंटरचे उद्घाटन अमेरिकेतील प्रख्यात कार्डिएक सर्जन डॉ. अजित दामले यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी डॉ. मनोज प्रधान, साईनाथ प्रधान, जहांगीरचे अध्यक्ष जहांगीर एचसीएच जहांगीर व डॉ. मनोज दुराईराज उपस्थित होते.*

# जहांगीर हॉस्पिटलच्या नवीन अत्याधुनिक कार्डिएक सेंटरचे औपचारिक उद्घाटन

**पुणे : जहांगीर हॉस्पिटलच्या नवीन अत्याधुनिक कार्डिएक सेंटरचे औपचारिक उद्घाटन शुक्रवारी अमेरिकेतील प्रख्यात कार्डिएक सर्जन डॉ. अजित दामले (मेरिट हॉस्पिटल, फर्गी) यांच्या हस्ते करण्यात आले.**

या वेळी ते म्हणाले, 'डॉ. मनोज प्रधान यांनी माझ्या आईवर केलेल्या शस्त्रक्रियेमुळे त्यांचे व माझे संबंध प्रस्थापित झाले. त्यामुळे त्यांच्या तांत्रिक कौशल्याबद्दल मला माहिती होती. जहांगीर हॉस्पिटलमधील पायाभूत सुविधा व तंत्रज्ञान आंतरराष्ट्रीय दर्जाचे आहे.

जे. एच. सी. जहांगीर (अध्यक्ष - जहांगीर हॉस्पिटल) म्हणाले की, 'अवघ व धोकादायक असलेल्या गरजेचे होते. कार्डिएक सर्जरीमधील री डू व इतर सर्जननी नाकारलेल्या अवघड शस्त्रक्रिया यशस्वीपणे करणारे डॉ. मनोज प्रधान यांच्या रूपाने उत्कृष्ट वैद्यकीय तज्ञ आज येथे मिळाले. सध्या दोन पूर्ण वेळ कार्डिएक सर्जन रुग्णांच्या सेवेसाठी सज्ज आहेत.

मुख्य कार्डिएक सर्जन डॉ. मनोज प्रधान म्हणाले की, 'हे युनिट मार्च २००६ मध्ये स्थापन करण्यात आले. मागील १० महिन्यात आम्ही २०० शस्त्रक्रिया यशस्वीपणे केल्या आहेत. एलव्ही फंक्शन, क्रोनिक रेनल फेल्यूर व वयोमान यासारख्या समस्या असणाऱ्या रुग्णांवर येथे उत्कृष्ट पद्धतीने उपचार करण्यात आले आहेत.

शस्त्रक्रियेसारखी नाही. पारंपारिक शस्त्रक्रियेमध्ये छातीच्या मध्यभागी मोठा छेद घेऊन शस्त्रक्रिया केली जाते. परंतु येथे छातीच्या बाजूला सहज लक्षात येणार नाही एवढा छोटासा छेद घेऊन ही शस्त्रक्रिया केली जाते.

दुसऱ्या एका विशेष तंत्रज्ञानात हाताच्या रेडिअल आर्टरीचा वापर करून फक्त २ सेंमी व्यासाचा छेद घेऊन ही शस्त्रक्रिया केली जाते. या शस्त्रक्रियेचा व्रण आपल्या हाताच्या घड्याळाच्या पट्ट्याखाली झाकला जातो.

'शस्त्रक्रियेद्वारे बसविण्यात आलेली नवीन वाहिनी योग्य प्रकारे कार्य करते याची खात्री देणारे फलोमेट्री उपकरण असलेले जहांगीर

orld Team